# “कँटन मराठी शाळा” वार्षिक स्नेहसंमेलन २०२४

रविवार ०९ जून हा तसा एकदम खास दिवस म्हणूनच उजाडला होता. एकीकडे T20वर्ल्डकपमधे भारतानी पाकिस्तान विरुद्ध हारता हारता जिंकायची कमाल केली होती आणि दुसरीकडे आमचा, कँटन मराठी शाळेचा, २०२३-२४चा हा वार्षिक सोहळा प्रथमच एखाद्या मोठ्या सभागृहात भरणार होता.

मे महिन्यामधे तोंडी आणि लेखी परीक्षेची धाकधूक संपली होती आणि जूनमधे सगळ्या विद्यार्थी, शिक्षकांची शाळेचा वार्षिक समारंभ साजरा करायची धामधूम चालू झाली होती. कँटन मधून सीमोल्लंघन करून Northville मधे भरलेल्या ह्या सोहळ्याला ५० विद्यार्थी, त्यांचे पालक, आजी-आजोबा असे सगळे मिळून साधारण १४० जण उपस्थित होते.

बालवर्ग ते चौथीच्या प्रत्येक वर्गातील मुलांनी पालकांसमोर मराठीतून गाणी, श्लोक सादर केले. सरस्वती प्रार्थना आणि भारत-USA च्या anthems नंतर बालवर्गातील २०+ च्या बालचमुनी ‘घडाळ्यात वाजला १’ गाण्यातून अभ्यास न करायची कारणे सादर करून पालकांना थक्क केले. त्यानंतर पहिली ते चौथीच्या मुलांनी मनाचे श्लोक, ‘सांग सांग भोलानाथ’, पसायदान, शिवरायांची गारद, keyboard, Viola वर गाणी असे विविध प्रकार सादर करून मराठी शाळेतील शिकवणीची आणि त्यांच्यातील गुणांची उत्तम झलक दाखवली.
२०२३-२४ चा video flashback बघून सगळ्यांनी पूर्णवर्षात केलेल्या उत्सवांचा, धमाल मस्तीचा एक reel आपापल्या memory मधे upload केला, तो कायमचा स्मरणात राहण्यासाठीच.

सर्वांना प्रशस्तिपत्रक प्रदान करताना विद्यार्थी-शिक्षक-पालक आणि सातासमुद्रांपालिकडून आलेल्या आजी-आजोबांच्या चेहेऱ्यावरून आपल्या नातवंडाचे कौतुक ओसंडून वहात होते. महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष श्री. प्रशांत जावकर, पदाधिकारी दीपक काका ह्यांची उपस्थिती शिक्षक-विद्यार्थ्यांना दिलेली शाबासकी सगळ्यांचा उत्साह द्विगुणित करून गेली. दीपा इंगळे कार्यक्रमाला येऊ नाही शकल्या तरी त्यांचे पाठबळ, मार्गदर्शन बहुमोल होते.
बक्षिस समारंभा नंतर मग मस्त पैकी सगळ्यांनी पिझ्झा, समोसे, Cupcakes, cutlets वर यथेच्छ ताव मारला आणि Summer vacationsचं planning discuss करत करत एकमेकांचा निरोप घेतला.

२०२३-२४ च वार्षिक सोहळा अजून एका कारणानी अतिशय खास होता, कँटन मराठी शाळेला यंदा १० वर्षे पूर्ण झाली! ५-६ विद्यार्थ्यांपसून चालू झालेला हा प्रवास दहावर्षात ५० विद्यार्थ्यांपर्यंत येऊन पोचला आहे आणि उन्हाळ्याचा थोडासा विसावा घेऊन, बालक-पालक-शिक्षकांचा संघ नव्या दमानी २०२४-२५ मधे अजून मोठा पल्ला गाठायला तयार आहे. तेव्हा भेटूच परत येत्या सप्टेंबर मधे…

ता. क.
दशकपूर्ती सोहळा उत्तमरित्या पार पाडण्यात सर्व शिक्षकांचे अपरिमित कष्ट होते. त्यासाठी सर्व शिक्षकांचे अभिनंदन आणि आभार. आम्हा सर्वांना कायम आर्थिक, मानसिक पाठबळ दिल्याबद्दल महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईटचे (#MMD) देखील धन्यवाद.

Video for Social Media:https://rb.gy/8b72c3
Photos : https://rb.gy/wusjuy

शब्दांकन
अभिजित जोगदेव
(कँटन शाळा मुख्याध्यापक)




कॅंटन मराठी शाळा
ANNUAL SUMMER
GET-TOGETHER
SCHOOL YEAR
CALENDAR


कॅंटन मराठी शाळा
ANNUAL SUMMER
GET-TOGETHER
SCHOOL YEAR
CALENDAR
2023-24